**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

जा.क्र.पंसश्री/प्रशासन/वशी/१/१०२२/२०२६
पंचायत समिती कार्यालय, श्रीवर्धन
दिनांक १४/०५/२०२६

प्रति,

मा.श्री/श्रीमती.......................................................................................

पंचायत समिती सभापती/उपसभापती/सदस्या/सदस्य

मु.पो..............................................तालुका श्रीवर्धन, जि.रायगड

प्रत- माहितीसाठी सविनय सादर.

१. मा. खासदार श्री. सुनिलजी तटकरे साहेब, गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा, जि.रायगड

२. मा. आमदार कु.अदिती सुनिल तटकरे मॅडम,गीताबाग मु.सुतारवाडी पो.जामगांव, ता.रोहा,जि.रायगड

३ मा. अध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

४. मा. उपाध्यक्ष सो. रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

५. मा. सभापती सो...............................................समिती रायगड जिल्हा परिषद अलिबाग

६. मा. विरोधी पक्षनेता रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

७. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

८. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग.

९. मा. खाते प्रमुख (सर्व)..............................................................रा.जि.प. अलिबाग.

प्रत:- माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

प्रत :- पंचायत समितीमधील सर्व शाखा प्रमुख, शाखा / कनिष्ठ अभियंता (बांधकाम /एस्.एस्.ए.)
सहाय्यक / कनिष्ठ लेखाधिकारी, कृषि अधिकारी (जनरल /वि.घ.यो.)
विस्तार अधिकारी (सर्व).....................................पंचायत समिती श्रीवर्धन.

सचिव तथा गट विकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती श्रीवर्धन

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

**इतिवृत्त भाग १**

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्य | उपस्थित अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|
| दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता | १) मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.<br>सभापती पंचायत समिती.<br>२) मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.<br>उपसभापती पंचायत समिती<br>३) मा.श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो.<br>पंचायत समिती सदस्य<br>४) मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे<br>पंचायत समिती सदस्य | १) सचिव तथा गट विकास अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>२) पशुधन विकास अधिकारी, पं.स.श्रीवर्धन<br>३) तालुका आरोग्य अधिकारी,श्रीवर्धन<br>४) उपअभियंता (ग्रा.पा.पु.),रा.जि.प.उपविभाग,म्हसळा<br>५) उपअभियंता (बांध.) (प्र),रा.जि.प.उपविभाग,श्रीवर्धन<br>६) बाल विकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.श्रीवर्धन<br>७) गट शिक्षणाधिकारी (प्र),पं.स.श्रीवर्धन<br>८) तालुका कृषी अधिकारी,श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>९) विस्तार अधिकारी (पंचायत) १ पं.स.श्रीवर्धन<br>१०) विस्तार अधिकारी (आरोग्य) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>११) विस्तार अधिकारी (कृषी) (प्र.),पं.स.श्रीवर्धन<br>१२) सहाय्यक लेखाधिकारी,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१३) शाखा अभियंता,पं.स.श्रीवर्धन (प्रतिनिधी)<br>१४) कनिष्ठ अभियंता,पं.स.श्रीवर्धन<br>१५) सहाय्यक प्रशासन अधिकारी, (प्र) पं.स.श्रीवर्धन<br>१६) कनिष्ठ प्रशासन अधिकारी,पं.स.श्रीवर्धन<br>१७) पशुधन पर्यवेक्षक,पं.स.श्रीवर्धन.<br>१८) गटसन्वयक (MSRLM) (प्र.) ,पं.स.श्रीवर्धन<br>१९) कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन),पं.स.श्रीवर्धन |

**पंचायत समितीची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती कार्यालय श्रीवर्धन महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेणेंत आली. त्या सभेचे इतिवृत्त भाग-१ व २**

## संक्षिप्त इतिवृत्त भाग-१

सभेच्या प्रारंभी मा.श्री. सचिन नंदाकर किर सो., सभापती,पं.स.श्रीवर्धन यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला व सर्वानी राष्ट्रगीत / महाराष्ट्र गीत म्हटले.

श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सर्वसाधारण सभेस उपस्थित मा.श्री. सचिन नंदाकर किर सो.सभापती, मा. श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो, पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे सो, पं.स.सदस्या, यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच सभेस उपस्थित सर्व खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करावी अशी विनंती मा.सभापती सो यांना केली.

मा.श्री. सचिन नंदाकर किर सो., सभापती यांनी सभेस उपस्थित मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे सो.उपसभापती, मा. श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर सो. पं.स.सदस्य, मा.श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे मॅडम,पं.स.सदस्या, मा.श्री.राजू दुंदा किरवे गट विकास अधिकारी तथा सचिव यांचे पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले तसेच उपस्थित सर्व खातेप्रमुख अधिकारी व कर्मचारी यांचे देखील पंचायत समितीच्या वतीने स्वागत केले. त्यानंतर मा.सभापती यांनी गट विकास अधिकारी तथा सचिव यांना सभेचे कामकाजास सुरूवात करणेबाबत सुचित केले.

## दु:खवटा ठराव

१) भारतीय संगीत क्षेत्रातील प्रतिभावंत गायिका पद्मविभुषण व महाराष्ट्र भूषण कै. श्रीम.आशाताई भोसले यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झालेबद्दल.
२) राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सिध्दिविनायक गणपती मंदिर ट्रस्टचे विश्वस्त पद भूषविणारे कै.मा.श्री.भास्कर दाजी विचारे, मु.फळसप पो.संदेरी ता.म्हसळा जि.रायगड यांचे दिनांक ०८/०४/२०२६ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने दु:खद निधन धक्क्याने दु:खद निधन झालेबद्दल.
३) कै.श्री.रविंद्र सिताराम मांजरेकर माजी सरपंच मु.पो.वडवली ता.श्रीवर्धन जि.रायगड यांचे दिनांक १४/०४/२०२६ रोजी दु:खद निधन झालेबद्दल.
४) कै. श्री.गोविंद हरिश्चंद्र पाटील सामाजीक कार्यकर्ते मु.पो.बोर्लीपंचतन ता.श्रीवर्धन जि.रायगड यांचे दिनांक १२/०४/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झालेबद्दल.
५) कै.श्री.इनायत अब्दुल रहेमान ठोकण, कंत्राटी वाहन चालक प्रा.आ.केंद्र वाळवटी यांचे दिनांक १०/०४/२०२६ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने दु:खद निधन झालेबद्दल.

## अभिनंदन ठराव

अभिनंदनाचे ठराव नव्हते.

**विषय क्र १ :-** मागिल मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
मागिल मासिक सभेचे इतिवृत्ताचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ते सर्वानुमते मंजूर करणेंत आले.

**विषय क्र २ :-** मागिल मासिक सभेतील ठराव पूर्ततेचा आढावा घेणे.
मागिल मासिक सभेतील ठरावावरील व चर्चेवरील केलेल्या कार्यवाहीचे वाचन श्री.राजू दुंदा किरवे सचिव तथा गट विकास अधिकारी यांनी केले व ठराव पूर्ततेचा आढावा घेणेंत आला.

**विषय क्र ३ :-** मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे.
मा.सदस्यांचे लेखी प्रश्न नव्हते.

**विषय क्र ४** :- मा.सदस्यांचे रजेचे अर्ज मंजूर करणे.
मा.सदस्यांचे रजेचे अर्ज नव्हते.

**विषय क्र ५** :- महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे.
महत्वाचे पत्रव्यवहार वाचनासाठी नव्हते.

**विषय क्र. ६** :- तालुक्यातील खाते प्रमुखांकडील विकास कामांचा आढावा घेणे.

**पशुसंवर्धन** :- पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती श्रीवर्धन यांचे प्रतिनिधी श्री.अक्षय राजेभाऊ उगले यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

**तालुका आरोग्य अधिकारी :-** श्री.नारायणकर, तालुका आरोग्य अधिकारी यांनी त्यांच्या विभागाचे रिक्त पदांचा आढावा दिला. त्यामध्ये त्यांनी आरोग्य विभागातील ६८ रिक्त पदांपैकी ३९ पदे भरण्यात आली असून ८ वैद्यकिय अधिकारी पदे मंजुर असुन १ पद रिक्त असल्याचे सांगितले.

त्यानंतर इतर कामे १००% पूर्ण झाली असून 'माझे गांव संपन्न गांव' कार्यक्रमाची तयारी सुरू आहे असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी, म्हणाले की, जे नवीन वैद्यकिय अधिकारी रूजू झाले त्यांनी परिचय द्यावा.

त्यावर उपस्थित नवीन वैद्यकिय अधिकारी श्री. विठ्ठल खटके (प्रा.आ.पथक, आदगांव) व श्रीम.सत्यभामा दुधाडे (प्रा.आ.केंद्र बोर्ली पंचतन) यांनी स्वत:ची ओळख करून दिली.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी, कधी रूजू झालात? असणारा अनुभव, रोज होणाऱ्या O.P.D ची संख्या व सामान्य प्रसुती बाबत माहिती विचारली.

त्यावर वैद्यकिय अधिकारी श्रीम.सत्यभामा दुधाडे यांनी, त्या २७/०४/२०२६ रोजी रूजू झाल्याचे सांगितले. तसेच दररोज सुमारे ८० ते ९० O.P.D होतात व त्या रूजू झाल्या पासून ४ सामान्य प्रसुती झाल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी, वैद्यकिय अधिकारी यांना पंचायत समिती कडून काय अपेक्षित आहे? असे विचारले.

त्यावर वैद्यकिय अधिकारी यांनी सध्या रिक्त असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जागा भराव्यात अशी मागणी केली.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी, प्रा.आ.केंद्र व उप केंद्र यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्यासाठी सर्वजन मिळून प्रयत्न करू असे पंचायत समिती माननीय सदस्य व मा.ग.वि.अ यांना सांगितले.

यावर मा.गट विकास अधिकारी यांनी, या अडचणी बाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना कळविले असून या बाबत योग्य तो पाठपूरावा केल्याचे सांगितले.

त्यानंतर श्री.खटके वैद्यकिय अधिकारी प्रा.आ.पथक आदगांव यांनी त्यांच्या आदगावं केंद्राच्या छतावर माकडांच्या उपद्रवामुळे छतावरील कौले व छत तुटल्यामुळे छताची दुरूस्ती म्हणजेच सिमेंट पत्रा टाकूण मिळणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी तालुका वैदयकिय अधिकारी यांना तुमच्याकडे यासाठी कोणता निधी येतो का? तसेच यातून दुरूस्ती करता येईल का? असे विचारले.

त्यावर ता.आ.अधिकारी यांनी माहे मार्च मध्ये एकदाच निधी येतो मात्र हा निधी मुख्यत्वे औषध खरेदीसाठी वापरण्यात येतो. त्यामुळे तो मोठ्या कामांसाठी अपूरा पडतो असे सांगितले. तसेच बोर्लीपंचतन

प्रा.आ.केंद्र इमारत धोकादायक स्थितीत असल्याचे सांगितले व या केंद्राचे इतर ठिकाणी स्थलांतर करणेबाबत सुचना मिळाल्याचे सांगितले मात्र जागेच्या अनुपलब्धतेमुळे हे अद्याप शक्य न झाल्याने तात्पुरत्या स्वरूपात डागडूजी केल्याचे सांगितले.

यावर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी_इमारत दुरूस्तीसाठी अंदाजे किती निधी आवश्यक आहे ते कळवावे असे सांगितले.

त्यानंतर ता.आ.अधिकारी यांनी कुडगांव येथील इमारत बांधणीचे काम निधीच्या कमतरते मुळे अपुर्ण असल्याचे व वारंवार एकच काम परत परत केले जात असल्याचे सांगितले.

यावर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी सदर कामाचा काँट्रॅक्टर कोण आहे असे विचारले.

त्यानंतर ता.आ.अधिकारी यांनी श्री.स्वप्नील बिऱ्हाडी असे सांगितले.

यावर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी आरोग्य विभागासाठी निश्चीत_निधी मिळणे बाबतचा ठराव मांडला.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी सध्या कोणती साथ चालू आहे का? तसेच कुपोषणाची समस्या आहे का? असे विचारले.

त्यानंतर ता.आ.अधिकारी यांनी कोणत्याही साथीचा प्रादूर्भाव नसल्याचे सांगितले तसेच तीव्र कुपोषणाची समस्या नाही असे सांगितले.

**उप विभाग बांधकाम :-** श्री.स्वप्निल आंधळे सहाय्यक अभियंता (श्रेणी-२) यांनी खालील प्रमाणे आढावा दिला.

| अ.क्र. | योजनेचे नाव | सन २०२५-२६ मध्ये एकूण कामे | पुर्ण झालेली कामे | प्रगतीत कामे | सुरू न झालेली कामे | निविदा स्तरावरील कामे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | खासदार निधी | १३ | ० | १२ | १ | १ |
| २ | आमदार निधी | ६ | १ | ३ | ० | २ |
| ३ | ३०५४ अंतर्गत ग्रामिण रस्ते मजबूतीकरण | ५ | ४ | १ | ० | ० |
| ४ | ५०५४ अंतर्गत जिल्हा रस्ते | ७ | ६ | १ | ० | ० |
| ५ | ५०५४ अंतर्गत साकव | २ | ० | २ | ० | ० |
| ६ | जि.प सेस फंड | ० | ५ | ० | ० | ० |
| ७ | ३०५४-२४१९ अंतर्गत रस्ते व पुल दुरूस्ती परिरक्षण कार्यक्रम गट ब व क | ० | ० | २ | ० | ० |
| ८ | ३६०४ ०५९५ क श्रेणी यात्रा स्थळांचा विकास | ३ | १ | ० | १ | १ |
| ९ | ३४५२ २०७९ क श्रेणी पर्यटन स्थळ विकास कार्यक्रम | १ | १ | ० | ० | ० |
| १० | डॉ.बाबासाहेब आंबेडकर अ.जाती व नवबौध्द | ० | १ | १ | ० | -२ |
| ११ | २० % जि.प सेस | २ | १ | १ | ० | ० |
| १२ | जिल्हा खनिज प्रतिष्ठाण | १३ | ० | ० | ० | १३ |
| १३ | पशुवैद्यकिय दवाखाना देखभाल व दुरूस्ती | ० | १ | ० | ० | ० |
| १४ | पशुवैद्यकिय दवाखाने चिकित्सालय बांधकाम | १० | ३ | ५ | २ | ० |
| | एकूण | ६२ | २४ | २८ | ०४ | १५ |

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी आपणाकडील सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये झालेल्या व मंजूर असणाऱ्या सर्व कामांची माहिती लिखित स्वरूपात द्यावे असे सांगितले.

**राज्य परिवहन महामंडळ:-** आगार प्रमुख श्रीवर्धन यांनी त्यांच्या विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला.

सध्या श्रीवर्धन आगारामध्ये १६३ कामगार कार्यरत असून साधारणपणे १०० कामगार नियमित स्वरूपात उपलब्ध असतात. आगाराकडे सद्यस्थितीत ५५ गाड्या असून त्या सर्व गाड्या चालू आहेत.

मा.श्री.सचिन नंदाकर किर सभापती यांनी लग्न व सुट्यांसाठी अतिरिक्त गाड्या सोडण्याची मागणी केली.

त्यावर आगार प्रमुखांनी शक्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

**म.रा.वि.वि.कं.लि. :-** सहाय्यक अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत विकास कंपनी लिमिटेड हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सार्वजनिक बांधकाम:-** उप अभियंता सार्वजनिक बांधकाम हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सार्वजनिक बांधकाम (पर्यटन):-** श्री.शुभम चवरे सहा अभियंता (श्रेणी-२) सार्वजनिक बांधकाम पर्यटन यांनी सध्यस्थितीला नवीन कोणतेही काम चालू नाही असे आढावा दिला.

**ए.बा.वि.से.यो:-** बाल विकास प्रकल्प अधिकारी श्री.प्रफुल्ल बागल यांनी खालील प्रमाणे आढावा दिला.

तालुक्यातील एकूण अंगणवाड्यांची संख्या १३४ आहे. ० ते ६ वयोगटातील ३४२९ बालके असून त्या सर्वांची आरोग्य तपासणी झाली आहे. सदर तपासणी अंती ३३८७ बालके सर्वसाधारण, ३९ बालके मध्यम कुपोषीत व ३ बालके तीव्र कुपोषित असल्याचे निदर्शनास आले. तसेच गरोदर/स्तनदा मातांची संख्या ४९१ आहेत. आयुक्त स्तरावरुन स्मार्ट अंगणवाडी केंद्र कार्यक्रम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमांतर्गत २७ अंगणवाडी केंद्र ही स्मार्ट अंगणवाडी केंद्र झाली असुन ४० अंगणवाडी केंद्रासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध झाले आहेत त्यामुळे आता स्मार्ट अंगणवाडी केंद्रांची संख्या ६७ होईल.

यावर माननीय सभापती श्री.सचिन कीर यांनी अंगणवाडी केंद्रांची वीज बील देयके कोणाकडून दिली जातात असे विचारले.

यावर श्री.प्रफुल्ल बागल यांनी वील बील देयके ग्रामपंचायतीकडून प्रदान केली जातात असे सांगितले. तसेच बऱ्याच वेळा वीज बील देताना ग्रामसेवकांकडून विलंब होतो परिणामी विद्युत वितरण कंपनीकडून वीज पूरवठा बंद केला जातो ही समस्या सांगितली. यावर उपाय म्हणुन सोलर प्रणालीचा अवलंब करण्याची कार्यवाही विचारात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर माननीय सभापती श्री.सचिन कीर यांनी वडवली अंगणवाडी केंद्राच्या ईमारत स्थितीबाबत प्रश्न उपस्थित केला

यावर श्री.प्रफुल्ल बागल म्हणाले कि त्यांनी वडवलीबाबत प्रस्ताव पाठवला आहे. तसेच बोर्ली येथे लाभार्थी संख्या ० असल्यामुळे या अंगणवाडी केंद्राचे वडवली मध्ये समायोजन केले जाणार आहे

यावर माननीय सभापती श्री.सचिन कीर यांनी तालुक्यात किती अंगणवाडी कर्मचारी आहेत असे विचारले.

यावर श्री.प्रफुल्ल बागल यांनी जवळपास १२५ अंगणवाडी कर्मचारी आहेत असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी अंगणवाडी मध्ये किती मदतनीस आहेत असे विचारले.

यावर श्री.प्रफुल्ल बागल यांनी १०० अंगणवाडी मदतनीस आहेत असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी अंगणवाडी मध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना एकत्र बोलावुन एका समन्वय बैठकिचे आयोजन करावे असे सांगितले.

यानंतर विभागाकडून मातृत्च वंदना योजनेबाबत माहिती देणेत आली.

**प्रादेशीक वन विभाग :-** प्रादेशीक वन अधिकारी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**सामाजिक वनीकरण:-** श्री. भीमराव सुर्यतळ वनरक्षक यांनी त्याच्या विभागाचा खालील प्रमाणे आढावा दिला.

वनविभागाची चिखलप येथे रोपवाटिका असून विविध प्रकारच्या रोपांचा पूरवठा केला जात असल्याची माहिती त्यांनी पुरवली. विभागामार्फत कोणतीही नवीन कामे सुरू नसले बाबत सांगितले.

श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी रोपवाटिकेमध्ये कोणती झाडे आहेत असा प्रश्न विचारला.

त्यावर रोपवाटिकेमध्ये करंज, कांचन, शिसम, शिरस, आवळा तसेच आपटा यांसारखी जंगली झाडे रोपवाटिकेमध्ये आहेत अशी माहिती वनविभाग प्रतिनिधींनी दिली.

श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी रोपवाटिकेमध्ये किती रोपे उपलब्ध आहेत असा प्रश्न विचारला. तसेच याचे वाटप कसे केले जाते असा प्रश्न विचारला.

त्यावर श्री.सुर्यतळ यांनी रोपवाटिकेमध्ये एक लाखापेक्षा अधिक रोपे उपलब्ध असल्याची माहिती दिली. रोपांच्या वाटपाच्या प्रश्नावर उत्तर देताना श्री.सुर्यतळ यांनी सुचविले कि रोपांबाबत ग्रामपंचायतीने पावसाळ्यापुर्वी पत्राद्वारे मागणी केल्यास त्या ग्रामपंचायतीला रोपे पुरवली जातील .

मा.श्री.सचिन नंदाकर किर सभापती महोदय यांनी सामाजिक वनीकरणासाठी कोठे जागा उपलब्ध आहे असा प्रश्न विचारला?

त्यावर श्री.सुर्यतळ यांनी सामाजिक वनीकरणासाठी जागा उपलब्ध नाही असे उत्तर दिले मात्र ग्रामपंचायतीने वृक्षारोपणासाठी जागा दिल्यास त्या ठिकाणी सामाजिक वनविभागामार्फत वृक्षारोपण केले जाते असे त्यांनी सांगितले.

मा.श्री.सचिन नंदाकर किर सभापती महोदय यांनी सामाजिक वनीकरण विभागाकडे कोणत्या कामासाठी निधी येतो? असा प्रश्न विचारला.

त्यावर श्री.सुर्यतळ यांनी फक्त रोपवाटिकेसाठीच शासनाकडून निधी दिला जातो असे सांगितले.

**खारभूमी:-** श्री.मयुर मुळीक खारभूमी विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला.

त्यामध्ये वेळास-वडवली आणि गालसूरे या २ ठिकाणी कामे सूरू असल्याची माहिती सादर करण्यात आली. दांडा ग्रामपंचायत हद्दीतील झडपा दुरुस्तीचे काम पूढील आठवड्यात केले जाणार असल्याची माहिती त्यांनी सांगितले.

त्यावर मा.श्री.सचिन नंदाकर किर सभापती यांनी वडवली येथील काम सुरुवात करण्यापुर्वी कामाबद्दल पुर्वसुचना द्यावी असे सांगितले.

**ग्रामिण पाणी पुरवठा:-** विभागाचा आढावा श्री.उदय पाटील उपअभियंता ग्रा.पा.पु यांनी दिला. त्यामध्ये त्यांनी DPDC अंतर्गत १० पैकी ५ कामे पूर्ण झाली आहेत असे सांगितले. पंचायत समिती सेस मधून ५ पैकी १ काम पुर्ण झाले आहे.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी पंचायत समिती सदस्यांना मिळणाऱ्या निधीपैकी किती निधी शिल्लक आहे असे विचारले.

यावर यांनी ९.५५ लाख एवढा निधी शिल्लक असल्याचे सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी या निधीतून उर्वरीत पंचायत समिती सदस्य सूचवतील त्या प्रमाणे कामे करावीत असे सांगितले. या कामांच्या निधीचे वितरण सर्व सदस्यांत समान प्रमाणात करावे असे देखील त्यांनी सांगितले.

यावर माननीय सभापती श्री.सचिन कीर यांनी नानवली येथील बोअरवेलचे काम सुचविले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी उपअभियंता ग्रामिण पाणी पुरवठा यांना सन २०२३-२०२४, २०२४- २०२५ आणि २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील सर्व कामांचा लेखी अहवाल द्यावा असे सांगितले. या अहवालात पुर्ण झालेली आणि अपुर्ण कामे नमुद करावीत असे त्यांनी सांगितले. कामांच्या पूर्णत्वेची व्यवस्थित खात्री करुनच सदर अहवाल सादर करावा असे सांगितले.

यानंतर श्री.उदय पाटील उपअभियंता ग्रा.पा.पु यांनी जलजीवन योजनेबाबत माहिती देताना ६६ कामांपैकी ४३ कामे पुर्ण झाली आहेत असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी सदर योजनांतर्गत कामे करताना संबंधीत ग्रामपंचायत, ग्रामसेवक आणि ग्रा.पा.पु विभाग यात समन्वय नसल्याचे सांगितले व याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच ग्रामसेवकांवर योजना पुर्ततेचे पत्र देण्याबाबत दबाव येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर मा.सभापती श्री.सचिन किर यांनी ज्या ठिकाणी कामांची पुर्तता झाली नाही त्याठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्यात अशा पुर्वी दिलेल्या सुचनांबाबत काय कार्यवाही करणेत आली असे विचारले.

यावर श्री.उदय पाटील यांनी आम्ही सर्व कामांना भेटी देत आहोत परंतू योजनांची संख्या खुप जास्त असल्यामुळे वेगात काम करणे अशक्य आहे. असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी ग्राम सेवकांवर कोणताही दबाव टाकू नये व ज्या ठिकाणी कामे सुरू आहेत अथवा पुर्ण झाली आहेत त्या ठिकाणी भेटी देऊन व ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्यांच्या समाधानाची खात्री करावी असे सांगितले.

यावर श्री.उदय पाटील यांनी पंचायत समिती व्दारा दिल्या गेलेल्या सुचनांचे पालन करून आम्ही संबंधित विषयावर यथोचित कार्यवाही करू असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी तुमच्या विभागाकडून मंजूर व चालू असलेल्या कामांची अंदाजपत्रकाची प्रत आहे काय असे विचारले.

यावर श्री.उदय पाटील यांनी अंदाजपत्रकाची प्रत जिल्हा परिषदेकडे जमा असते व पंचायत समिती स्तरावर या प्रती उपलब्ध नाहीत असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी हे पंचायत समिती पाणी पुरवठा विभागाकडे या अंदाजपत्रकाच्या प्रती असायलाच हव्यात जर नसेल तर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करून अंदाजपत्रक प्रती पाणी पुरवठा विभागाकडे मागवाव्यात असे म्हणाले.

यावर श्री.उदय पाटील उप अभियंता ग्रा.पा.पू यांनी आम्ही अंदाजपत्रकाच्या प्रतींची मागणी जिल्ह्याकडे केली आहे व सदर प्रती प्राप्त झाल्या नंतर आम्ही कळवू असे सांगितले.

त्यानंतर मा.गट विकास अधिकारी यांनी किती ग्राम सेवकांनी जल जिवन मिशन अंतर्गत कामांची पुर्तता झाल्याचे पत्र दिले आहे असे विचारले.

यावर श्री.उदय पाटील उप अभियंता ग्रा.पा.पू यांनी १६ ग्राम सेवकांनी पत्र दिले असे सांगितले.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी ज्या ग्राम सेवकांनी काम पुर्ण झाल्याचे पत्र दिले आहेत त्या कामांची फेर तपासणी करावी असे सांगितले. तसेच बोर्ली येथे झालेल्या कामाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करताना लोकांना अपेक्षित दर्जाचे काम पाणी पुरवठा विभागाकडून व्हावे असे सांगितले.

यावर श्री.उदय पाटील उप अभियंता ग्रा.पा.पू यांनी आम्ही या संदर्भात जबाबदारीने व यथायोग्य कार्यवाही करू असे सांगितले.

**लघु पाटबंधारे उप विभाग कोलाड:-** श्री.ओमकार रटाटे_ कनिष्ठ अभियंता यांनी खालील प्रमाणे आढावा दिला.

श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले, कुडकी आणि रानवली येथील धरणांमधील पाणी पातळी व उपलब्ध पाणी साठ्याबाबत त्यांनी माहिती दिली. कार्ले धरणातील पाणी पातळी ११२.८० मीटर असून धरण ४१% भरलेले आहे. कूडकी धरणातील पाणी पातळी ११४.७० मीटर असुन धरण ४०% भरलेले आहे. रानवली धरणातील पाणी पातळी १०९.७० मीटर असून धरण सुमारे १४% ते १५% भरलेले आहे कार्ले व कूडकी धरणांतून सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी पुरवठा करण्यात येत असल्याचे सांगितले.

त्यानंतर मा. श्री.सचिन नंदाकर कीर, सभापती यांनी धरणांची देखरेख करणाऱ्या कामगारांबद्दल विचारणा केली असता कार्ले धरणासाठी तटकरे (कंत्राटी मजूर), कुडकी धरणासाठी श्री. सतीश नाक्ती व रानवली धरणासाठी श्री.पयेर नियूक्त असल्याची माहिती देणेत आली.

त्यानंतर मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी कार्ले धरणातून बोर्लीपंचतन गावासाठी नळ योजना पाइपलाईन टाकण्या संदर्भात मागील वर्षी सादर केलेल्या अर्जावर झालेल्या कार्यवाहीबाबत विचारणा केली. त्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असल्याचे सांगितले. पाहणीवेळी ग्रामस्थ व ग्रामसेवक श्री.मयेकर उपस्थित होते. तथापी कालव्या मधून पाइपलाईन टाकणे शक्य नसल्याचे नमूद करण्यात आले.

श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी सदर समस्येवर काय उपाय योजना करता येतील असे विचारले.

त्यावर श्री.ओमकार रटाटे_ कनिष्ठ अभियंता यांनी पुढील पर्याय सुचविले.

१. कालव्याच्या आउटलेट मधून पाइपलाईन टाकणे.

२. थेट धरणातून पाइपलाईन टाकणे.

त्यानंतर श्री.नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी कालव्या मधील पाणी प्रामुख्याने बागायतदारांसाठी वापरले जात असले तरी सामान्य ग्रामस्थांना पाण्याची अधिक आवश्यकता असल्याचे नमूद केले. बोर्ली येथे तीव्र पाणी टंचाई असून चार दिवसांतून एकदा पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती देण्यात आली. तसेच पाणी गळतीच्या समस्येमुळे पंप २४ तास सुरू ठेवावा लागत असून पंपाची दोन वेळा दुरूस्ती करण्यात आली आहे. कालवा साफसफाई साठी दरवर्षी अंदाजे रक्कम रू.३५,०००/- ते ४०,०००/- इतका खर्च येत असल्याचे ही सांगितले. सदर समस्येच्या अनुषंगाने कॅनलच्या एका बाजूने पाणी घेण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मात्र त्यास परवानगी देण्यात आलेली नाही.

त्यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी संबंधित मागणीचा पाठपुरावा करून समस्येवर योग्य तोडगा काढण्याची सूचना दिली.

त्यानंतर मा.श्री.सचिन नंदाकर किर, सभापती यांनी कुडकी येथील सुमारे १००० मीटर लांबीचा बंधारा तसेच शेतीसाठी संरक्षक भिंत बांधण्याच्या प्रस्तावाबाबत विचारणा केली.

त्यावर श्री.ओमकार रटाटे_ कनिष्ठ अभियंता यांनी मागील वर्षी सादर केलेला प्रस्ताव मंजूर झालेला नसून चालू वर्षात सदर प्रस्ताव पुन:श्च सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

**बंदर विभाग:-** बंदर विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागाचा आढावा दिला.

**ल.सिं.(जलसंधारण) माणगांव:-** सहाय्यक अभियंता लघु सिंचन, माणगाव हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**तालुका भुमी अभिलेख :-** उप अधिक्षक भूमी अभिलेख हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**एन.आर.एच.एम. :-** आरोग्य विभाग एन.आर.एच.एम चा आढावा श्री.हर्षल मदन यांनी दिला.

सदर आढाव्यामध्ये त्यांनी जननी सुरक्षा योजनेसंदर्भात माहिती दिली. या योजनेअंतर्गत ५१ लाभार्थ्यांना लाभ मिळाला असून प्रत्येक लाभार्थ्याला ७०० रुपये दिले जातात.

यानंतर माननीय पंचायत समिती उपसभापती श्रीम.पुजा शिंदे यांनी इतर काही योजना आहेत का असे विचारले.

यावर श्री.हर्षल मदन यांनी आरोग्य विभागाकडे मातृत्व वंदना योजना होती परंतु ती आता एकात्मिक बाल विकास योजना विभागाकडे हस्तांतरित झाल्याचे सांगितले.

**शिक्षण विभाग :-** ग.शि.अ श्री. रमेश चव्हाण यांनी रिक्त पदांचा पुढील प्रमाणे अहवाल दिला. शिक्षकांची एकूण मंजूर पदे २२८ आहेत त्यापैकी मराठी माध्यमाची १८६ शिक्षक मंजूर असून ऊर्दु माध्यमाची ४२ आहेत. त्यानंतर मराठी माध्यमाचे १३४ आणि ऊर्दु माध्यमाची २८ शिक्षक असे एकूण आणि १६२ शिक्षक कार्यरत आहेत. तसेच ६६ शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे त्यांनी सांगितले.यानंतर त्यांनी शाळानिहाय रिक्त पदांचा अहवाल दिला.

गटशिक्षणाधिकारी आणि वरिष्ट विस्तार अधिकारी यांचे प्रत्येकी एक पद असून ते रिक्त आहे असे त्यांनी सांगितले, शिपायाचे एक पद असुन ते रिक्त आहे .केंद्रप्रमुखाची १० पदे असुन सर्व पदे रिक्त आहेत.

यावर माननीय सभापती श्री. सचिन नंदाकर किर यांनी वडवली येथे किती पट आहे असा प्रश्न विचारला.

त्यावर ग.शि.अ श्री. रमेश चव्हाण यांनी वडवली येथे १२ पट आहे असे सांगितले.

यावर माननीय सभापतींनी जेथे पट कमी आहे तेथे शिक्षक देणार आहात का असा प्रश्न विचारला.

ग.शि.अ. श्री. रमेश चव्हाण यांनी पवित्र पोर्टल माध्यमातून शिक्षक भरती होणार आहे असे सांगितले. त्यानंतर संबंधित ठिकाणी शिक्षक रुजू होतील असे सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी ज्याठिकाणी पटसंख्या समाधानकारक आहे त्याठिकाणी शालेय व्यवस्थापन समिती आणि पंचायत समिती सदस्य यांची संयुक्त बैठक घेउन विविध समस्या आणि संभाव्य उपाययोजना यांवर चर्चा करण्याचे सुचविले.

त्यानंतर ग.शि.अ श्री. रमेश चव्हाण यांनी शाळांना वृक्षलागवड उपक्रमांतर्गत नियोजित लक्ष्य साध्य करण्यासाठी ग्रामपंचायतीने वृक्षपुरवठा करावा अशी मागणी केली.

यावर शक्य ती मदत करण्याचे आश्वासन देणेत आले.

**<u>शा.पो.आ.</u> :-** ग.शि.अ श्री. रमेश चव्हाण यांनी शालेय पोषण आहार बाबतचा आढावा दिला. जि.प.च्या ८६ आणि नगरपरिषदेच्या ५ व खाजगी अनुदानित शाळा १७ असुन एकुण १०८ शाळा आहेत. स्वयंपाकी आणि मदतनिसांची संख्या १६२ असुन पहिली ते पाचवी विद्यार्थी संख्या ३४६२ असुन ६ वी ते आठवी विद्यार्थी संख्या १९५० आहे. पहिली ते आठवी एकूण विद्यार्थी संख्या ५३८२ आहे असे त्यांनी सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी शालेय पोषण आहार व्यवस्थापन कोण करते असे विचारले

यावर ग.शि.अ श्री. रमेश चव्हाण म्हणाले कि, शालेय पोषण आहार व्यवस्थापनाचे कार्य मुख्याध्यापक आणि शालेय व्यवस्थापण समिती करते.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी शालेय पोषण आहाराबद्दल काही तक्रारी आहेत का असे विचारले.

त्यावर ग.शि.अ श्री.रमेश चव्हाण यांनी याबाबत कोणतीही तक्रार नाही असे सांगीतले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी शालेय पोषण आहारासाठी मिळणाऱ्या गोष्टींची गुणवत्ता कशी असते असे विचारले.

त्यावर ग.शि.अ श्री.रमेश चव्हाण यांनी शालेय पोषण आहारासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींची गुणवत्ता अत्यंत उत्कृष्ट असुन ते योग्य तपासणी करून व गुणवत्ता निकषांची पुर्तता करत असेल तरच वापरले जातात असे सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी गुणवत्ता तपासणी साठी तालुका स्तरावर काय व्यवस्थापन व्यवस्था आहे असे विचारले.

यावर ग.शि.अ श्री.रमेश चव्हाण यांनी गुणवत्ता तपासणी साठी एक पथक असून त्या पथकामध्ये ते स्वत: गट शिक्षणाधिकारी आणि केंद्रप्रमुख असल्याची माहिती दिली. तपासणी मध्ये जर खराब धान्य आढळले तर ते परत पाठवले जाते असेही त्यांनी सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी शालेय पोषण आहारासंदर्भात कोणतीही तक्रार येउ नये याची दक्षता घ्यावी अशी सुचना दिली.

**<u>सर्व शिक्षा अभियान</u> :-** श्री.शेख कनिष्ठ अभियंता हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**<u>ग्राम पंचायत</u> :-** ग्रामपंचायत विभागाचा आढावा श्री. नागे यांनी खालील प्रमाणे दिला.

श्रीवर्धन तालूक्यात एकूण ४२ ग्रामपंचायती आहेत. माहे ३१ मार्च २०२६ अखेर घरपट्टी वसूली ९२.२६%, वीजकर वसुली ९२.२६%, आरोग्य कर वसुली ९२.३% व पाणीपट्टी वसुली ९०.८२% इतकी करणेत आली आहे. ०.२५% खर्चाची पूर्ण वसूली करून जिल्ह्याला जमा केली आहे. ५% दिव्यांग कल्याण निधी पुर्ण खर्च करणेत आला आहे. १०% महिला कल्याण निधी ९१% खर्च झाला आहे. तसेच १५% मागासवर्गीय निधी ८९% खर्च करणेत आला आहे. १५ व्या वित्त आयोगाचा निधी फेब्रुवारी २०२६ अखेर ८८.०४% खर्च करणेत आला आहे. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेअंतर्गत नागलोली येथील काम पुर्ण झाले आहे असे त्यांनी सांगितले.

यानंतर श्री.किशोर नागे विस्तार अधिकारी पंचायत यांनी समाजकल्याण विभागाचा आढावा खालील प्रमाणे दिला.

दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कोलमांडला बौद्धवाडी अंतर्गत रस्ता तयार करणे बौद्धवाडी विहिरीवर पंप बसवून पाईप लाईन व पिचिंक करणे हे काम पुर्ण झाले आहे. कोलमांडला बौद्धवाडी अंतर्गत रस्ता करणे व सायगांव बौद्धवाडी अंतर्गत पोहोच रस्ता करणे हि कामे सुरू आहेत. सायगांव बौद्धवाडी अंतर्गत गटार लाईनचे काम करणे या कामाची वर्क ऑर्डर देणेत आली असुन वावे बौद्धवाडी अंतर्गत समाज मंदीर बांधणे या कामाचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे परंतु त्याला अद्याप मान्यता मिळालेली नाही. पंचायत दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत लाभ देणेसाठी २० लाभार्थ्यांची निवड करणेत आली होती. मात्र यातील दोन लाभार्थी हे जिल्हा परिषद अंतर्गत दिव्यांग लाभ योजनेसाठी पात्र ठरले असल्याने ते दूबार लाभार्थी ठरत आहेत म्हणून त्यांची नावे रद्द करुन दोन नवीन नावे सामाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे सांगितले.

**<u>पं.स.बांधकाम</u> :-** श्री. स्वप्निल आंधळे कनिष्ठ अभियंता यांनी पंचायत समिती विभागाचा आढावा दिला.

**<u>पं. स. शेती</u> :-** कृषी विभागाचा आढावा श्री.प्रविण भोसले यांनी खालील प्रमाणे दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत श्री. विजय हाटे यांच्या विहिरीचे काम सुरू आहे.

यावर सन्माननीय पंचायत समिती सदस्य श्री. सुकूमार तोंडलेकर यांनी या योजनेअंतर्गत अवजारे मिळतात का असे विचारले

यावर श्री.प्रविण भोसले म्हणाले कि जर ऑनलाईन अर्ज सादर केला तर प्रकरण मंजूर झाल्यास अवजारे मिळतात.

यावर मा.सचिन नंदाकर किर सभापती पं.समिती यांनी विचारले कि विहिरीसाठी किती अनूदान मिळते?

यावर श्री.प्रविण भोसले म्हणाले कि, विहिरीसाठी ४ लाख इतके अनूदान मिळते व पंपसेटसाठी ४० हजार एवढ्या अनुदानाची तरतूद आहे. हे अनूदान मिळणेसाठी महाडिबीटी या पोर्टल वर ऑनलाईन अर्ज सादर करावा लागतो. अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमाती यांनाच हे अनुदान लाभ मिळते. सदर अनुदान हे १००% आहे असे त्यांनी सांगितले.

यावर सन्माननीय पंचायत समिती सदस्य श्री. सुकूमार तोंडलेकर यांनी याअंतर्गत किती लाभार्थी संख्या आहे असे विचारले

यावर श्री.प्रविण भोसले म्हणाले कि, मागील वर्षी लाभार्थी संख्या ३ होती आणि या वर्षात सद्यस्थितीला १ लाभार्थी आहे.

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ही अनुसूचित जमातींसाठी असुन या अंतर्गत लाभार्थी निरंक आहेत.

यावर सन्माननीय पंचायत समिती सदस्या श्रीम. पुजा शिंदे यांनी बायोगॅस योजनेचा लाभ किती लाभार्थ्यांना मिळाला आहे असे विचारले.

यावर श्री.प्रविण भोसले यांनी बायोगॅस योजनेचा लाभ घेण्यासाठी मागील वर्षी दोन अर्ज आले होते परंतु त्यांना लाभ मिळाला नाही असे सांगितले.

वृक्ष लागवड अभियानांतर्गत जीवंत रोपांची टक्केवारी ८१.२८% आहे असे त्यांनी सांगितले.

**<u>उप जिल्हा रूग्णालय:-</u>** उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन याबाबत वैद्यकिय रूग्णालयाच्या प्रतिनिधींनी अहवाल सादर केला.

मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स. सदस्य यांनी रूग्णालयातील स्वच्छतागृहाच्या दुर्दशेबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले असल्यामुळे आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होत असल्याची बाब त्यांनी नमुद केली. तसेच या समस्येबाबत रूग्णालयाने त्वरीत कार्यवाही करावी अशी सुचना त्यांनी केली. रूग्णालयीन प्रशासनाच्या विविध भागात समन्वय नसल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या मागणीला सन्माननीय पं.स.सदस्या शिंदे मॅडम यांनी दूजोरा दिला. रुग्णालयातील विहिरीबाबत आणि तीची स्वच्छता केली जाते का असा प्रश्न सन्माननीय सभापती महोदयांनी विचारला असता याबाबत निश्चित माहिती नसल्याचे रुग्णालय प्रतिनिधींनी सांगितले.

मा.श्री. सुकूमार तोंडलेकर पं.स सदस्य यांनी पुढील बैठकिस उपजिल्हा रूग्णालय श्रीवर्धन येथील वरिष्ठ अधिकारी यांनी हजर रहावे अशी सुचना देण्यात आली.

**<u>एम.एस.आर.एल.एम</u> :-** एम.एस.आर.एल.एम. विभागाचा आढावा श्री.स्वप्निल जाधव यांनी दिला. त्यांनी लखपती दिदि या उपक्रमाबद्दल माहिती दिली. हा उपक्रम ७२% साध्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.श्री.सुकुमार तोंडलेकर पं.स.सदस्य यांनी फुड स्टॉल उपक्रमाच्या सद्यस्थितीबद्दल विचारले.

यावर श्री.स्वप्निल जाधव यांनी दिवेआगार, दिघी आणि हरिहरेश्वर येथील समुद्रकिणाऱ्यालगत नियोजित असणाऱ्या फुड स्टॉल उपक्रमाबद्दल माहिती दिली. या बाबत पावसाळ्यानंतर पुढील कार्यवाही करणेत येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर मा.श्रीम.पुजा शिंदे पं.स.सदस्या यांनी श्रीवर्धन तालुक्यातील स्वयं सहाय्यता समुहांची संख्या किती आहे असे विचारले.

यावर श्री.स्वप्निल जाधव यांनी तालुक्यात ५८८ स्वयं सहाय्यता समुह आहेत असे सांगितले.

मा.श्रीम.पुजा शिंदे पं.स.सदस्या यांनी चिखलप येथील स्वयं सहाय्यता समुहाच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच बचत गट समस्या व मार्गदर्शन या बाबत चर्चा करण्यासाठी एक चर्चासत्र आयोजित करु असे सांगितले.

यावर प्रभाग संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याचे नियोजित आहे असे श्री.स्वप्निल जाधव यांनी सांगितले. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सर्व राष्ट्रीयीकृत बँकांना विविध योजनेची माहिती देणेसाठी आमंत्रित केले जाणार असल्याचे सांगितले.

**<u>टंचाई पाणी पुरवठा</u> :-** श्रीम. निकिता चित्ते कनिष्ठ अभियंता यांनी तालुक्यातील पाणी टंचाई बाबत अहवाल दिला.

**हातपंप :-** हातपंप यांत्रिकी हे सभेस उपस्थित न राहिल्याने त्यांचेकडील विषयांचा आढावा सभागृहाला घेता आला नाही.

**<u>विषय क्र. ७</u> :- पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे.**

पंचायत समिती श्रीवर्धनची पुढील मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार, दिनांक २१/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता पंचायत समिती श्रीवर्धनच्या महाराष्ट्र भूषण आदरणीय ती.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्रमांक. ८</u> :- मा.सभापती सो. यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे.**

कोणत्याही विभागाचे आयत्या वेळेचे विषय नव्हते

सभेचा समारोप करतांना मा.गट विकास अधिकारी पंचायत समिती, श्रीवर्धन यांनी, सदर सभेत सन्माननीय सदस्य यांनी मांडलेल्या मुद्याबाबत पुर्तता करावी तसेच आगामी सभेपुर्वी सदर सभेतील चर्चेप्रमाणे

सभापती श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, मा. पं.स.सदस्य श्री. सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर, मा.पं.स.सदस्या श्रीम. अस्मिता प्रदर्शन चोरगे, यांचे तसेच सभेस उपस्थित खातेप्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले, सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन मा. सभापती सो., यांचे वतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग-१)
पंचायत समिती, श्रीवर्धन

(श्री.सचिन नंदाकर किर)
सभापती
पंचायत समिती, श्रीवर्धन

# पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| सभेची तारीख व वेळ | प्रस्तावाचा विषय | प्रस्तावाचा मजकूर | सूचक अनुमोदक | दुरुस्ती असल्यास | | दिलेल्या मतांची संख्या | | दुरुस्ती नंतर मतदाना नंतर अंतिम निर्णय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सूचक | अनुमोदक | बाजूने | विरुध्द | मजकूर | ठराव क्र. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | **दु:खवटा ठराव** | | | | | | | |
| **दिनांक: २३/०४/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** | **दु:खवटा ठराव** | **ठराव क्रमांक :-७** भारतीय संगीत क्षेत्रातील प्रतिभावंत गायिका पद्मविभुषण व महाराष्ट्र.भूषण कै. श्रीम.आशाताई भोसले यांचे दिनांक १२/०४/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झालेबद्दल हि पंचायत समिती सभा दु:खवटा व्यक्त करीत आहे. | | | | | | | |
| | | **ठराव क्रमांक :-८** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सिध्दिविनायक गणपती मंदिर ट्रस्टचे विश्वस्त पद भूषविणारे कै.मा.श्री.भास्कर दाजी विचारे, मु.फळसप पो.संदेरी ता.म्हसळा जि.रायगड यांचे दिनांक ०८/०४/२०२६ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने दु:खद निधन झालेबद्दल झालेबद्दल हि पंचायत समिती सभा दु:खवटा व्यक्त करीत आहे. | | | | | | | |
| | | **ठराव क्रमांक :-९** कै.श्री.रविंद्र मांजरेकर यांचे माजी सरपंच मु.पो.वडवली ता.श्रीवर्धन जि.रायगड दिनांक १४/०४/२०२६ रोजी दु:खद निधन झालेबद्दल हि पंचायत समिती सभा दु:खवटा व्यक्त करीत आहे. | | | | | | | |
| | | **ठराव क्रमांक :-१०** कै. श्री.गोविंद पाटील यांचे सामाजीक कार्यकर्ते मु.पो.बोर्लीपंचतन ता.श्रीवर्धन जि.रायगड दिनांक १२/०४/२०२६ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झालेबद्दल हि पंचायत समिती सभा दु:खवटा व्यक्त करीत आहे. | | | | | | | |
| | | **ठराव क्रमांक :-११** कै.श्री.इनायत अब्दुल रहेमान ठोकण, कंत्राटी वाहन चालक प्रा.आ.केंद्र वाळवटी यांचे दिनांक १०/०४/२०२६ रोजी हृदय विकाराच्या धक्क्याने दु:खद निधन झालेबद्दल दु:खवटा व्यक्त करीत आहे. | | | | | | | |
| | | दु:खद निधन झालेल्या व्यक्तीच्या मृतात्म्यास चिरशांती लाभावी म्हणून सभागृहात श्रध्दांजली वाहणेत आली.<br>**सूचक:-** मा.श्री सचिन नंदाकर किर, सभापती<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** | | | | | | | |

## पंचायत समिती मासिक सर्वसाधारण सभा (इतिवृत्त भाग -२)

| | | |
|---|---|---|
| | **अभिनंदन ठराव** | **अभिनंदन ठराव**<br>अभिनंदन ठराव नव्हते |
| | **विषय क्रमांक:-१**<br>मागिल महाच्या मासिक सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे | पुर्तता<br>पंचायत समितीच्या मागिल सभेच्या इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा भाग एक मध्ये नमुद केल्याप्रमाणे घेणेत आला. तसेच दिनांक २४/०३/२०२६ रोजी सभेचे ईतीवृत्त मंजुर करणेत आली. |
| | **विषय क्रमांक:-२**<br>मागिल महाच्या मासिक सभेतील ठराव पुर्तता आढावा घेणे. | पुर्तता<br>मागिल महाच्या मासिक सर्वसाधारण सभेचे ठराव पुर्तता करणेत आली आहे. |
| | **विषय क्रमांक:-३**<br>मा.सदस्यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नांना उत्तरे देणे. | पुर्तता<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे. |
| | **विषय क्रमांक:- ४**<br>सन्मा.सदस्यांच्या रजेच्या अर्जास मंजूर देणे. | पुर्तता<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन्मा पंचायत समिती सदस्यांचे रजेचे अर्ज नाहीत. |
| | **विषय क्रमांक:- ५**<br>महत्वाच्या पत्रव्यवहाराचे वाचन करणे. | पुर्तता<br>इतिवृत्त भाग-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे महत्वाचे पत्रव्यवहार वाचनास नव्हते. |
| | **विषय क्रमांक:- ६**<br>विकास कामांचा आढावा घेणे. | पुर्तता.<br>खाते प्रमुख, पशुधन विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, उप अभियंता (बांधकाम), बाल विकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता (ग्रा.पा.पु),ग.शि.अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, विस्तार अधिकारी (सर्व), शाखा अभियंता (बांध.) (प्रभारी), कनिष्ठ अभियंता इ. मागील महात केलेल्या कामांचा आढावा सभागृहाला दिला. |

| | | |
|---|---|---|
| | **विषय क्र.६ (२) (१)**<br>पं.स आरोग्य विभागासाठी निधी मिळणेबाबत | **ठराव क्र.१२**<br>पंचायत समितीला आरोग्य विभागासाठी १० लक्ष रुपयांचा आरोग्य निधी मिळावा. श्रीवर्धन तालुका हा ग्रामिण भाग असल्याने येथे पायाभूत सुविधांचा अभाव असल्या कारणाने, ईमारत दुरूस्ती करणेसाठी, प्रा.आ.केंद्र व उपकेंद्रासाठी साठी १० लक्ष रुपयांचा आरोग्य निधी मिळणे बाबत ही पंचायत समितीची सभा हा ठराव सर्वानुमते पारीत करीत आहे.<br>**सूचक :-** मा.श्री.सुकुमार दत्तात्रेय तोंडलेकर पं.स.सदस्य<br>**अनुमोदक:-** मा.श्रीम.पुजा प्रशांत शिंदे, उप सभापती<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| | **विषय क्रमांक :- ७**<br>पुढील सभेची तारीख व वेळ ठरविणे. | पुर्तता<br>पंचायत समिती श्रीवर्धनची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक २१/०५/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता महाराष्ट्र भूषण आदरणीय तीर्थ.डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती श्रीवर्धन येथे घेण्याचे सर्वानुमते ठरले. |
| | **विषय क्रमांक:-८**<br>मा.सभापती सो.,यांच्या परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करणे. | पुर्तता<br>मा.सभापती सो., यांच्या परवानगीने चर्चेला येणारे आयत्या वेळेचे विषय नव्हते. |

सचिव तथा गटविकास अधिकारी (वर्ग - १)
पंचायत समिती, श्रीवर्धन

(मा.श्री सचिन नंदाकर किर)
सभापती
पंचायत समिती, श्रीवर्धन